DAY — **16** SEAT NUMBER | | | | | | |

2025	III	04	1500	**J-371**	(M)

EDUCATION (78)

Time : 3 Hrs. **(7 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) कृतिपत्रिकेतील सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*

(२) कृतिपत्रिकेतील उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(३) प्रत्येक प्रश्नाचा उत्तराचा प्रारंभ नवीन पानावर करावा.

प्र. १. **(अ)** दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) मुक्त शिक्षण ------ या प्रकारचे शिक्षण आहे.

(अ) औपचारिक

(ब) अनौपचारिक

(क) सहज

(ड) विशेष

(२) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाचे मुख्यालय ------ या ठिकाणी आहे.

(अ) मुंबई

(ब) पुणे

(क) नागपूर

(ड) औरंगाबाद

(३) 'भारताचे भवितव्य येथील वर्गखोल्यांमधून घडवले जात आहे,' असे ------ मध्ये सांगितले आहे.

(अ) विद्यापीठ शिक्षण आयोग

(ब) माध्यमिक शिक्षण आयोग

(क) भारतीय शिक्षण आयोग

(ड) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६

(४) 'माझे सत्याचे प्रयोग' हे ------ यांचे आत्मचरित्र आहे.

(अ) रवींद्रनाथ टागोर

(ब) महात्मा गांधी

(क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(ड) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

(५) 'शिक्षण ही आजची व उद्याची एकमेवाद्‌वितीय अशी गुंतवणूक आहे,' हे ------ चे प्रमुख तत्त्व आहे.

(अ) माध्यमिक शिक्षण आयोग

(ब) विद्यापीठ शिक्षण आयोग

(क) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६

(ड) भारतीय शिक्षण आयोग

(ब) खालील प्रश्नांची एक ते दोन शब्दांत उत्तरे लिहा : (५)

(१) वर्तमानपत्र, नियतकालिके, पुस्तके ही समूह संपर्काची कोणती माध्यमे आहेत?

(२) अध्ययनाच्या दोन उपपत्तीची नावे लिहा.

(३) घटनेच्या कोणत्या कलमानुसार शिक्षणाचा समावेश बालकाच्या मूलभूत हक्कात झाला आहे?

(४) माध्यमिक शिक्षण आयोगाची स्थापना कोणत्या वर्षी करण्यात आली?

(५) कोणत्या अध्ययनात संगणक तंत्रज्ञान आणि पारंपरिक अध्ययन याचे मिश्रण पहावयास मिळते?

(क) स्तंभ 'अ' व स्तंभ 'ब' यांतील योग्य सहसंबंध ओळखा व जोड्या जुळवा : (५)

स्तंभ 'अ'	स्तंभ 'ब'
(अ) ऐतिहासिक संशोधन पद्धत	(१) मर्मदृष्टी
(ब) समग्र आकलन	(२) वाहन दुरुस्ती, पर्यटन इ.
(क) कौशल्याधारित शिक्षण	(३) भूतकाळाशी निगडित संशोधन पद्धती
(ड) अभ्यासपूरक उपक्रम	(४) सामाजिक भूमिका पार पाडण्यास समर्थ बनवणारे शिक्षण
(इ) सामाजीकरण	(५) बालवीर, वीरबाला, राष्ट्रीय छात्रसेना, इत्यादी

(ड) खालील प्रश्नांची केवळ एका वाक्यात उत्तरे लिहा : (५)

(१) आवर्तने म्हणजे काय?

(२) प्रश्नावली म्हणजे काय?

(३) सामाजिक परिवर्तन म्हणजे काय?

(४) भारतीय शिक्षण आयोगाचे अध्यक्ष कोण होते?

(५) प्रयोग म्हणजे काय?

प्र. २. खालील संकल्पना चित्रे पूर्ण करा (कोणतेही चार) : **[८]**

(१) (२)



(२)



(२)

(३) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ चे स्वरूप (२)

(४) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची प्रमुख कार्ये (२)

(५) परीक्षा पद्धतीचे प्रकार (२)

(६) (२)



प्र. ३. खालील प्रश्न/विधानांनुसार तुमचे मत नोंदवा (कोणतेही चार) : **[८]**

(१) वर्गव्यवस्थापन ही एक कला आणि शास्त्र आहे.

(२) कौशल्य शिक्षणामुळे रोजगाराची संधी वाढते.

(३) आंतरजालचे फायदे-तोटे दोन्ही ही असतात.

(४) शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे.

(५) गुणवत्तापूर्ण शिक्षण आपुलकीच्या व आनंददायी वातावरणात असावे.

प्र. ४. टिपा लिहा / संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा (कोणतेही चार) : **[८]**

(१) सामाजिक परिवर्तन

(२) प्रश्नावली

(३) अध्ययन प्रक्रिया

(४) शिक्षण संचालक

(५) विद्यापीठ शिक्षण आयोग

(६) भ्रमणध्वनी (मोबाईल)

प्र. ५. खालील मुद्द्यांच्या आधारे फरक स्पष्ट करा (कोणतेही दोन) : **[८]**

(१) अध्ययनावर परिणाम करणारे आंतरिक घटक व बाह्य घटक

(i) व्याख्या

(ii) घटक

(iii) फायदे

(iv) मर्यादा

(२) लेखी परीक्षा व तोंडी परीक्षा :

(i) व्याख्या

(ii) प्रश्न प्रकार

(iii) फायदे

(iv) मर्यादा

(३) ऐतिहासिक संशोधन पद्धती व वर्णनात्मक संशोधन पद्धती :

(i) व्याख्या

(ii) उदाहरण

(iii) फायदे

(iv) मर्यादा

प्र. ६. खालील प्रश्नांवर प्रत्येकी ५० ते ८० शब्दांत उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : **[८]**

(१) प्रायोगिक संशोधन पद्धतीची वैशिष्ट्ये लिहा.

(२) दिव्यांगांसाठी असणाऱ्या शासकीय योजना सांगा.

(३) राज्य परीक्षा परिषदेची प्रमुख कार्ये लिहा.

(४) अध्ययन प्रक्रियेची वैशिष्ट्ये सांगा.

प्र. ७. खालील प्रश्नांची प्रत्येकी १०० ते १५० शब्दांत उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : **[१०]**

(१) सामाजिक परिवर्तनात शिक्षकाची भूमिकेचे वर्णन करा.

(२) 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९' मधील प्रमुख तरतुदी लिहा.

(३) मुक्त शिक्षणाची वैशिष्ट्ये सांगा.

प्र. ८. खालील प्रश्नांचे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तर लिहा **[१०]**

(कोणतेही एक) :

(१) महात्मा गांधी यांच्या विषयी सविस्तर माहिती लिहा :

(अ) शैक्षणिक विचार

(ब) शैक्षणिक योगदान

(२) अभ्यासक्रमाबाबत खालील मुद्द्यांवर सविस्तर माहिती द्या :

(अ) अभ्यासक्रमातील घटक

(ब) अभ्यासक्रम विकसनाची तत्त्वे

◆◆◆